# नियामक मंडळाची ३६ वी बैठक दिनांक २१ ऑक्टोबर २००३

मा. ना. अजित पवार, मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळे) व फलोत्पादन आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ३६ वी बैठक दि. २१.१०.२००३ रोजी पाटबंधारे सभागृह, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र.३६/१

''ठराव करण्यात येतो की,

१. नियामक मंडळाच्या ३५ व्या बैठकीत पारित झालेल्या ठरावांपैकी ३५/३ रद्द करण्यात यावा व पुणे महानगरपालिकेस मुठा डावा कालवा किमी ८ ते २७ मधील जमीन हस्तांतरित करावयाची कार्यवाही मंजूर ठराव क्र. ३३/२ प्रमाणे करण्यात यावी.

२. नियामक मंडळाच्या ३५ व्या बैठकीतील ठराव क्र. ३५/१, ३५/२, ३५/४ ते ३५/१४ कायम करण्यात येत आहेत.''

ठराव क्रमांक ३६/२

"ठराव करण्यात येतो की, महामंडळांतर्गत भूसंपादन व पुनर्वसन तसेच प्रकल्पग्रस्तांची न्यायालयीन प्रकरणे यापोटी सद्यःस्थितीत असलेले रु.२३१ कोटींचे दायित्व भागविण्यासाठी वर्ष २००३-०४ या आर्थिक वर्षात निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनास विनंती करण्यात येत आहे. तसेच भूसंपादन व पुनर्वसनासाठी निधी उपलब्ध करुन देताना सदरचे दायित्व पूर्वीचे असल्याचे त्यास मा. राज्यपालांचे आदेश निर्गमित होण्यापूर्वीचे असल्याने त्यास मा. राज्यपालांचे निधी वाटपाचे सूत्र लागू करु नये, अशी विनंती शासनास नियामक मंडळ करीत आहे."

ठराव क्र.३६/३

''ठराव करण्यात येतो की,

१. महामंडळांतर्गत देण्यात येणाऱ्या विविध परवान्यांसाठी परवाना शुल्क आकारणी करण्याबाबतचा प्रस्ताव महामंडळाच्या उत्पन्नात वाढ होणार असल्याने तत्वतः मान्य करण्यात येत आहे.

२. परवाना शुल्काचे दर भाड्याने द्यावयाच्या जागांचे मासिक/वार्षिक शुल्क जागेचे क्षेत्रीय महत्वाप्रमाणे आकारण्यात यावेत. तसेच सदरच्या दरांची निश्चिती इतर विभागांचे

प्रचलित दर विचारात घेऊन करण्यात यावी व दर आकारणीचा तुलनात्मक प्रस्ताव पुढील बैठकीत मान्यतेस्तव सादर करावा.''

ठराव क्र. ३६/४

''ठराव करण्यात येतो की,

१. दूधगंगा प्रकल्पातून होणारी गळती थांबविण्यासाठी उपाय योजना करण्यासंदर्भात शासनाने श्री. एम. जी. पाध्ये, यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या तज्ञ समितीच्या शिफारशींनुसार तयार केलेल्या भौतिक व आर्थिक कार्यक्रमास व त्यासाठी करावयाच्या वर्ष २००२-०३ च्या दरसूचीवरील आधारित रु.३३५.७८ लक्ष इतक्या अंदाजित खर्चास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. हा कार्यक्रम शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

२. महामंडळाकडील निधीची कमतरता लक्षात घेऊन व दूधगंगा धरणाची गळती थांबविणे अत्यावश्यक असल्याने तज्ञ समितीच्या उपाय योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक तो निधी शासनाने योजनेतर निधीमधून उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती शासनास करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्रमांक ३६/५

"ठराव करण्यात येतो की, परिशिष्ट क्र. ४ मध्ये दर्शविलेल्या १ मोठा व २ लघु पाटबंधारे प्रकल्पांच्या अंदाजपत्रकांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यास नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे."

ठराव क्र. ३६/६

''ठराव करण्यात येतो की, इंद्रायणी नदीवर मौ. टाकवे खुर्द व मौ. बोरज ता. मावळ जि. पुणे येथे श्री. मनमोहन आनंद या खाजगी उद्योजकास पूल तथा बंधारा त्यांचे खर्चाने बांधण्यास खालील नमूद केलेल्या व इतर अनुषंगिक अटींच्या अधीन राहून परवानगी देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर पूलाची मालकी शासनाची/महामंडळाची राहील.

२. सदर पूलाच्या बांधकामाचा खर्च श्री. मनमोहन आनंद यांनी करावा.

३. सदर पूलाची देखभाल दुरुस्ती श्री. मनमोहन आनंद यांनी करावी.

४. सदर पूल इंद्रायणीच्या नदीच्या पुरामध्ये बुडू नये अशाप्रकारे संकल्पन करावे.

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे



कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

५. सदर पूलाचे बांधकाम महामंडळाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या देखरेखी खाली करण्यात यावे.

६. सदर पूल आम जनतेस वापरासाठी खुला राहील.

७. सदर पूल दोन्ही बाजूस शासकीय जमिनीस जोडावा व उद्योजकाच्या हद्दीमध्ये सदर रस्त्यासाठी जागा उपलब्ध करुन द्यावी.''

ठराव क्रमांक ३६/७

"ठराव करण्यात येतो की,

१. पवनानगर येथील शासकीय निवासस्थाने सध्या रहात असलेल्या खाजगी व्यक्तींना मालकी हक्काने देण्यात येऊ नयेत."

ठराव क्र. ३६/८

''ठराव करण्यात येतो की, श्री. य. रा. गोरे, शाखा अभियंता यांच्या निधनानंतर त्यांच्या ताब्यातील शासकीय निवासस्थान ताब्यात होईपर्यंतच्या कालावधीमध्ये भाडे आकारणी तसेच अनुज्ञप्ती शुल्क आकारणी याबाबत अशा पद्धतीच्या प्रकरणांमध्ये शासन स्तरावर कशा पद्धतीने कार्यवाही करण्यात येते. याबाबत शासनाकडून माहिती घेण्यात यावी व तोपर्यंत सदर प्रकरणचा निर्णय प्रलंबित ठेवावा.''

ठराव क्र. ३६/९

''ठराव करण्यात येतो की, वर्ष २००३-०४ मध्ये आतापर्यंत महामंडळास निधी उपलब्ध न झाल्याने तातडीचे खर्च (वीजबिले, टेलिफोन बिले, इंधन खर्च, न्यायालयीन प्रकरणी देय रकमा, पाणीपट्टी, धरण सुरक्षिततेची तातडीची कामे इ.) भागविण्यासाठी खास बाब म्हणून अधिनियम क्र.१५ कलम २४ ला अपवाद करुन ऑगस्ट २००३ मध्ये पाणीपट्टीच्या महसूलाद्वारे जमा झालेल्या रु.४.१कोटी रकमेतून करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच नियामक मंडळाची मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

अत्यावश्यक खर्च म्हणून ऑगस्ट २००३ मध्ये जमा झालेल्या पाणीपट्टीच्या महसूलातून रु.४.११ कोटी रक्कम अत्यावश्यक कामांसाठी (वीज देयके, पाणीपट्टी, दूरध्वनी देयके, न्यायालयीन प्रकरणे, इंधन/वाहन दुरुस्ती, धरण सुरक्षिततेची कामे, नद्या जोड प्रकल्पाचे सर्वेक्षण) केलेला खर्च कलम २४ ला अपवाद करुन केलेला असल्याने त्यास मान्यता देणेविषयी नियामक मंडळ शिफारस करीत आहे.''

ठराव क्र. ३६/१०

''ठराव करण्यात येतो की,

१. महामंडळामार्फत रोखे उभारणीसाठी शासनास मार्च २००३ अखेर देय असलेली शासन हमी शुल्काची व दंड व्याजाची रु.६१५.१९ कोटी इतकी रक्कम माफ करण्याबाबत नियामक मंडळ शासनास विनंती करीत आहे.

२. सप्टेंबर २००३ नंतर कर्जरोख्यांद्वारे उभारण्यात येणाऱ्या निधीसाठी शासनाने हमी शुल्क आकारु नये, अशी विनंती नियामक मंडळ शासनास करीत आहे.''

आयत्या वेळचे विषय

ठराव क्र. ३६/११

''ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाची बिकट आर्थिक स्थितीमुळे इतर महामंडळाकडून घेतलेल्या अल्पमुदत ठेवीतील उर्वरीत रकमेची परतफेड करण्यासाठी, महामंडळास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनास विनंती करण्याच्या प्रस्तावास महामंडळाच्या नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३६/१२

''ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाची आर्थिक स्थिती बिकट असल्याने महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते अदा करण्यासाठी व अल्पमुदतीचे कर्ज परतफेड करण्यासाठी महामंडळाच्या युनायटेड वेस्टर्न बँक लि. व कॅनरा बँकेकडे असलेल्या ठेवीवर अधिकर्षाव्दारे घेतलेल्या रकमेची व त्यावरील व्याजाची परतफेड करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनास सादर करण्याच्या प्रस्तावास महामंडळाच्या नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३६/१३

''ठराव करण्यात येतो की, शासनाने क्र. संकीर्ण ०२/०५/(२८१)/इमारती-२ दि.११.९.२००३ च्या निर्णयानुसार गौण खनिजाचे स्वामित्व शुल्क कंत्राटदाराने भराव असे प्रसृत केले असल्याने या निर्णयाची अंमलबजावणी महामंडळाच्या कार्यकक्षेत करण्याच्या दृष्टीने प्रकल्पांच्या कामांच्या निविदांमध्ये योग्य ते बदल करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३६/१४

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील उपसा सिंचन योजना पूर्ण करण्यास महामंडळ स्तरावरील काही अडचणींमुळे विलंब झाला असल्याने सदर कामांच्या पंपींग यंत्रसामुग्रीच्या निविदेतील शर्तीमध्ये खालील प्रमाणे बदल करण्यास व त्याप्रमाणे देयके अदा करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

१. पंपाच्या आश्वासित कामगिरी चाचणीचा कालावधी प्रथम चाचणी दिनांकापासून प्रत्येक पंपास १५० तास इतका राहील. यासह, पंपगृहातील सर्व पंपांच्या चाचणीचा एकत्रित कालावधी किमान १००० तासांचा असणे बंधनकारक राहील.

२. ज्या उपसा सिंचन योजनांतर्गत पंपांचा पुरवठा झाला आहे. तथापि उभारणी व चाचणी झालेली नाही त्याबाबत देयक अदायगी तरतूदीनूसारचे देयक कंत्राटदारास बँक गॅरंटीवर देण्यात यावे.

३. आश्वासित कामगिरी चाचण्या पूर्ण होऊन पंपगृह कार्यान्वित झाल्यानंतर ६ महिन्यानंतर महामंडळाने कंत्राटदाराकडून ताब्यात घ्यावे.

४. बँक गॅरंटीवर देयक अदा झाले तरी अशी सर्व कामे निविदा शर्तीनुसार पूर्ण करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

५. महामंडळाने पंपगृह ताब्यात घेतल्यानंतर कंत्राटदाराने निविदा शर्ती मध्ये नमूद केलेल्या दोष निवारण कालावधीत कंत्राटदाराच्या खर्चाने निदर्शनास आलेल्या दोषांचे निवारण करावे.

६. महामंडळाने पंपगृह ताब्यात घेतल्यानंतर कंत्राटदाराने त्यांच्या सुरक्षा ठेवीच्या रकमेइतकी बँक गॅरंटी (दोष निवारण कालावधी पर्यंत ग्राह्य असलेल्या) द्यावी.

७. कंत्राटदाराने ही बँक गॅरंटी दिल्यानंतर मूळ निविदा शर्तीनुसार त्यांच्या सुरक्षा ठेवीची रक्कम परत करण्यात यावी.''

## सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेले प्रकल्प

परिशिष्ट क्र. ४

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | सुधारित प्रशासकीय मान्यतेची किंमत रु.लक्ष | दरसूची वर्ष |
|---|---|---|---|
| (अ) | **मोठे प्रकल्प** | | |
| १. | सांगोला शाखा कालवा प्रकल्प ता. सांगोला, जि. सोलापूर | २८८०१.०० | २००१-२००२ |
| (ब) | **लघु प्रकल्प** | | |
| १. | बृहत् लघु पाटबंधारे प्रकल्प भिवर्गी ता. जत, जि. सांगली | ३३८७.६७ | २०००-२००१ |
| २. | लघु पाटबंधारे तलाव फये ता. भुदरगड, जि. कोल्हापूर | ९४५.४९ | १९९९-२००० |

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे